N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** महाड शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0125 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/10/2025 16:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/10/2025
**Time Period (कालावधी):** पहर 1 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/10/2025
**Time From (वेळेपासून):** 00:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/10/2025 **Time (वेळ):** 01:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 024
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/10/2025 15:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** दस्तुरी फाटा येथे ,सुभाष आर्केड अपार्टमेंट, ए विंग समोर पार्किंगमध्ये,महाड, महाड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.परेश अनिल घोलप

(b) **Father's Name** (वडीलांचे नाव) : अनिल घोलप

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 201,दुसरा मजला,ए विंग,सुभाष आर,सुभाष आर्केड,पार्किंग महाड ,महाड , महाड शहर,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 201,दुसरा मजला,ए विंग,सुभाष आर,सुभाष आर्केड,पार्किंग महाड ,महाड , महाड शहर,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7776820405

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोह 961 विशाल विलास वाघाटे | | | 1. पोलीस मुख्यालय, रायगड-अलिबाग,रायगड-अलिबाग,महाड शहर,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 300,000.00 |

N.C.R.B (फाइली अधि.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

300,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वरील तारखेस वेळी व ठिकाणी यांतील आरोपीत लोकसेवक पोह/961 विशाल विलास वाघाटे हे पोलीस अधिकारी नेम.पोलीस मुख्यालय, रायगड-अलिबाग येथे कार्यरत असुन यांतील तक्रारदार यांचेविरूध्द जुन्या पुर्वीच्या प्रकरणामध्ये पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करणेसाठी व मदत करण्यासाठी लोकसेवक आरोपीत पोह/961 विशाल विलास वाघाटे यांनी स्वतासाठी दिनांक 09/10/2025 रोजी पंचासमक्ष 5,00,000/- रू. लाचेची मागणी करून पहिला हप्ता 3,00,000/- रू.लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन वरील मजकुराची खबर रजिस्टर दाखल करुन मा.वरीष्ठांचे आदेशाने पुढील तपास श्रीमती.सरीता भोसले ,पोलीस उप अधिक्षक , अँन्टी करप्शन ब्युरो रायगड अलिबाग हे करीत आहेत.
प्रथम खबर अहवाल दि.10/10/2025

मी श्री.परेश अनिल घोलप, वय 30, धंदा-जमिन खरेदी विक्री, रा.ठि.201 दुसरा मजला,अ े विंग,सुभाष आर्केड दस्तुर नाका नातेखिंड मार्ग महाड जिल्हा रायगड मोबाईल नंबर 7776820405 समक्ष महाड शहर पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. मी महाड तालुक्यामध्ये जमिन खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असून त्यावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे.
माझी पत्नी नामे ऐश्वर्या परेश घोलप ही गृहीणी असुन ती घरीच असते. माझे पत्नीला दोन सख्या चुलत बहीणी असुन त्यांची नावे रोशनी राकेश बारटक्के वय 24 वर्षे व मृणाली राकेश बारटक्के वय 17 वर्ष असुन त्या गोकुळेश अपार्टमेंट, गवळ आळी, महाड या ठिकाणी राहण्यास आहेत. त्या माझे पत्नीचे नातेवाईक असल्याने त्याचे घरी येणे-जाणे असायचे. सन-2023 मध्ये रोशनी बारटक्के ही एका मुलाला माझे घरी घेवुन आली. त्याचे नाव प्रथमेश मनोहर वरणकर होते व तीने सांगीतले की हा माझा चांगल्या परीचयाचा असुन त्याला कामाची आवश्यकता आहे. त्यामुळे त्याला तुझेकडे कामाला ठेव असे सांगीतल्याने मी त्याला माझे सोबत कामावर ठेवले होते.
परंतु काही दिवसात मला त्याचे चाल चलन ठिक दिसत नव्हते. मला समजले रोशनी व प्रथमेश यांचे प्रेमसंबध आहेत. त्यावेळी त्या गोष्टीला आम्ही सगळयांनी विरोध केला होता.रोशनीच्या आई वडीलाना सुध्दा दोघांचे प्रेमसंबध मान्य नव्हते. परतु रोशनीच्या हट्टापुढे घरातील लोकांनी तिचे लग्न प्रथमेश सोबत लावुन दिले. दोघांचे लग्न झाल्यानंतर रोशनीचे आई वडील यांना असे वाटत होते की, मी मुददामहुन दोघांचे लग्न लावुन दिले असुन त्यांच्या मुलीचे आयुष्याची वाट लावली आहे,असे वारंवार बोलु लागले. त्याच दरम्यान रोशनीची आई नामे सौ सुश्मीता बारटक्के हीचे पर पुरुषासोबत संबंध असल्याची माहीती मला व सदरची माहती मी रोशनीचा भाउ ऋतीक बारटक्के याला सांगीतली. त्यावेळी तो खुप भडकला होता. परंतु घरामध्ये खुप मोठी भांडण होतील म्हणून मी त्याला शांत राहण्याचा सल्ला दिला. ऋतीक बारटक्के याला बहीणीचे लग्न प्रथमेश सोबत झालेले अजिबात आवडले नव्हते त्यामुळे त्यांच्या घरात नेहमी भांडण होत असे.
दिनांक 04/01/2024 रोजी प्रथमेश याला मी कामावरून काढुन टाकले याचा राग मनात धरून तो राकेश बारटक्के व सुष्मिता बारटक्के यांना माझे विरूध्द भडकावत असे. दिनांक 07/08/2024 रोजी प्रथमेश वरणकर याच्यावरून ऋतीक बारटक्के यांच्या घरी मोठी भांडणे झाली त्यावेळी राकेश बारटक्के व सुष्मिता बारटक्के यांनी जावयाची बाजु घेवुन त्यांच्यावर हात उचलला तसेच रोशनी व प्रथमेश यांनी सुध्दा मारहाण केली, म्हणुन त्याच दिवशी .ऋतीक बारटक्के हा महाड शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार नांद करण्याकरीता गेला होता. त्यावेळी पोलीस स्टेशन मध्ये पोलीस हवालदार विशाल वाघाटे यांनी त्याची तक्रार नोंद करून घेतली. परंतु ऋतीक बारटक्के यांनी घरातील चालु असलेल्या सर्व गोष्टी विशाल वाघाटे यांना सांगीतल्या असता, त्या गोष्टीचा फायदा घेवुन विशाल

वाघाटे यांनी त्यांच्या घरातील लोकांना त्रास देण्यास सुरवात केली. त्यावेळी बारटक्के यांच्या कुटुंबातील लोकांचा असा समज झाला की या सर्व गोष्टीला मी जबाबदार आहे व त्यांच्या घराची वाट मी लावली आहे. म्हणुन दिनांक 23/04/2024 रोजी गवळआळी येथे हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमाकरीता गेलो असता सौ सुष्मीता व राकेश बारटक्के यांनी मला धमकी दिली की, तु आमच्या आयुष्याची वाट लावली आहेस आता तुझे पण आयुष्य बरबाद करतो. त्यावेळी मी कायदेशीर तक्रार नोंदविणेकरीता विषाल वाघाटे यांना फोन केला तेव्हा विषाल वाघाटे यांनी जेव्हा ते ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यावर असतील त्यावेळी महाड शहर पोलीस ठाणे येथे येवुन तक्रार देण्यास मला सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 10/05/2024 रोजी सौ.सुष्मिता बारटक्के व श्री.राकेष बारटक्के यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार दिलेली आहे.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने विशाल वाघाटे यांना भेटण्यासाठी महाड शहर पोलीस ठाणे येथे गेलो असता, लोकसेवक विशाल वाघाटे यांने मला बाहेरच अडवुन सांगीतले की मला माहीत आहे तु कश्याकरता आला आहेस, तु आता जास्त नाटक करू नकोस सौ सुष्मीता व राकेश बारटक्के यांनी मला सर्व सांगीतले आहे, तुझे व त्यांची छोटी मुलगी मृणाल हीचे संबंध आहेत व ते तुझेवर पोक्सो कायदया अंतर्गत गुन्हा दाखल करणार आहेत. हा गुन्हा दाखल झाला तर तुझे आयुष्याची वाट लागेल असे बोलुन मला धमकावले व भिती सुध्दा घातली होती. त्यानंतर ते बोलले की मी सगळ मॅनेज करून देतो तु टेन्शन घेवू नकोस.

मी नको त्या प्रकरणात अडकायला नको या भितीने पोलीस हवालदार विशाल वाघाटे यांच्यावर भरोसा ठेवला. त्यावेळी त्यांनी मला 25 लाख रूपयाची मागणी केली होती. या प्रकरणामध्ये रोशनी व प्रथमेश या दोघांनी विशाल वाघाटे यांना पाठीशी घालुन माझे कडुन आतापर्यत टप्प्याटप्याने 22 लाख रूपये उकळले आहेत. व विशाल वाघाटे यांना मी वेळोवेळी त्यांचे आर्थिक गरजेकरीता आतापर्यंत 90,000/- रूपये ऑनलाईन पाठवले आहेत. एवढे पैसे दिल्यानंतर मी विषाल वाघाटे यांना वरिल प्रकरणाबाबत विचारणा केली असता माझे प्रकरण मिटले असल्याची खात्री विशाल वाघाटे यांनी दिल्यानंतर मी महाड शहर सोडुन जुन 2024 पासुन पुण्यामध्ये वास्तव्य करीत होतो.

दिनांक 02/10/2025 रोजी नवरात्री मध्ये गरबा खेळण्याकरीता रात्री गवळ आळी, महाड मध्ये गेलो होतो. त्यावेळी राकेश व सुष्मिता बारटक्के यांनी मला अवाच्य भाषेत शिवीगाळ करून माझा अपमान केला त्यामुळे त्या ठिकाणावरून मी निघुन गेलो. दिनांक 04/10/2025 रोजी रात्री पोलीस हवलदार विशाल वाघाटे यांचे तिन मिस कॉल आले होते. मी त्यानंतर लगेच त्याना फोन करून विचारले असता ,त्यांनी सांगतीले की,त्यांना राकेश बारटक्के व सुष्मीता बारटक्के यांनी फोन करून सांगीतले की ते परत माझेवर पोक्सो अंतर्गत केस करणार आहेत. त्यामुळे मला खुप टेन्शन आले. मी पोलीस हवलदार विशाल वाघाटे यांना विनवणी केली असता ते मला बोलले की सदरचा विषय आपण भेटुन बोलु असे सांगुन फोन ठेवुन दिला. दिनांक 05/10/2025 रोजी पोलीस हवालदार विशाल वाघाटे हे दुपारी माझे घरी आले त्यावेळी मी त्यांना बोललो की मी काही केले नसताना व आतापर्यत मी वेळोवेळी आपल्याला व त्यांना पैसे दिले आहेत. त्यावेळी विशाल वाघाटे यांनी ते दोघे माझे शब्दाबाहेर नाहीत मला विचारल्याशिवाय कोणतीही केस करणार नाहीत. सदरचे प्रकरण पुर्ण मिटवायचे असेल तर मला 5,00,000/ रूपये दे व आजच्या आजच मला 2,00,000/-लाख रूपये दे तरच हे प्रकरण पुर्ण मिटवतो असे बोलुन रोशनी व प्रथमेश यांना फोन केला.

मला पुर्ण खात्री झाली होती की रोशनी व प्रथमेश या दोघांना हाताशी धरून माझे मजबुरीचा फायदा घेवुन माझे कडुन विशाल वाघाटे यांनी वेळोवेळी 22 लाख रूपये घेतले आहेत. परंतु सदरच्या गोष्टीला मी पुर्ण कंटाळुन गेलो होतो व विशाल वाघाटे यांना 5,00,000/-रूपये देण्याची माझी इच्छा नाही, तसेच विशाल वाघाटे व माझे मध्ये कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार प्रलंबीत नाहीत. मला पोलीस हवालदार श्री.विषाल वाघाटे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवर कारवाई होणेकरीता मी दिनांक 08/10/2025 रोजी अॅन्टी करप्षन ब्युरो रायगड-अलिबाग कार्यालयामध्ये जावून पोलीस उप अधिक्षक, श्रीमती सरिता भोसले, लाचलुचपत प्रतिबंध विभाग रायगड-अलिबाग यांची भेट घेवुन त्यांचेकडे माझी लेखी तक्रार दिली. पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी मी दिलेल्या तक्रारीवर समक्ष म्हणून सही केली. मी दिलेल्या तक्रारीची पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सरिता भोसले यांनी मला सुचना देवून पुढील कार्यवाहीकरिता दि. 09/10/2025 रोजी सकाळी 13.30 वाजता वहूर ता.महाड येथे मुंबई-गोवा हायवे रस्त्याचे सर्व्हिस रोडलगत येण्याबाबत सुचना दिल्या.

दिनांक 09/10/2025 रोजी मी वहूर गाव, महाड येथे मुंबई-गोवा हायवे रस्त्यालगत माझे मारूती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एमएच-06-बीव्ही-5456 सह गेलो असता तेथे खाजगी एर्टीगा कार क्रमांक एमएच-06-सीडी-

7028 वाहन उभे होते. तेथे पोलीस उप अधीक्षक श्रीमती सरिता भोसले मॅडम हजर होत्या. मी त्यांचेजवळ गेलो असता त्यांनी तेथे हजर असलेले सापळा पथकामधील अंमलदार तसेच पंच 1) श्री.शुभम कल्याण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक, लिपिक, पंचायत समिती अलिबाग 2) श्री.शैलेश भास्कर वर्तक, स्थापत्य अभियांत्रीक सहाय्यक, पंचायत समिती अलिबाग यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सरिता भोसले यांनी माझे तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करून पडताळणीमध्ये लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यास पुढे सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे आम्हास तसेच पंचास सांगितले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सुचनेप्रमाणे मी माझी सविस्तर तक्रारीची हकीगत दोन्ही पंचांना तोंडी सांगीतली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी माझी लेखी तक्रार दोन्ही पंचास वाचावयास दिली. ती त्यांनी वाचून पाहीली. सदर तक्रार व मी सांगितलेली हकीगतीप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सूचनेप्रमाणे माझे तक्रारीवर सहया केल्या.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचांस माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या आणि 14.10 वा. माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी पडताळणीकरीता माझी मारूती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एमएच-06-बीव्ही-5456 या वाहनाने पंच नं.1 भुषन शिंदे, यांचेसह लोकसेवक श्री.वाघाटे पोलीस हवालदार यांची भेट घेणेकरीता दस्तूरी नाका, महाडे जाण्याच्या सुचना

देवुन लोकसेवक श्री.वाघाटे यांना भेटण्यासाठी त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क साधुन भेटण्याचे ठिकाणाची खात्री करण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 7776820405 यावरून माझे मोबाईलमध्ये सेव्ह असलेला लोकसेवक श्री.वाघटे यांचा मोबाईल नंबर 9130835647 या नंबरवर 14-23 वाजता फोन लावून मोबाईलचा लाऊडस्पिकर ऑन करून फोन केला असता लोकसेवक विषाल वाघाटे यांनी कॉल रिसिव्ह केला. त्यानंतर लोकसेवक वाघाटे यांचेशी चर्चा केली असता त्यांना कधी भेटायच असे विचारले असता "अर्ध्या एक तासात भेटू... फोन करतो मी..." असे म्हणाले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी सांगितले की, लोकसेवक श्री.वाघाटे हे फोनवर संपर्क करून भेटण्यास कोठे यावे याबाबत सांगतील. त्याप्रमाणे लोकसेवक वाघाटे यांचा कॉल येईपर्यंत थांबण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 18.00 वाजण्याचे दरम्यान माझे मोबाईल फोनवर लोकसेवक वाघाटे यांचा कॉल आला.सदरचा कॉल उचलण्यापुर्वीच कट झाला. त्यानंतर पुन्हा 18.01 वाजण्याचे दरम्यान माझे मोबाईल फोनवर लोकसेवक वाघाटे यांचा कॉल आला, त्यावेळी मी सदरचा कॉल रिसीव्ह करून मोबाईल फोनचा स्पिकर ऑन करून कॉल रिसीव्ह केला. त्यावेळी लोकसेवक वाघाटे यांचेषी चर्चा करून कुठे भेटायच याबाबत विचारल असता, "चालेल मगं तुम्ही सांगा ना तिथे तुम्ही म्हणला तिथे शिफट होईल" असे मला म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवक श्री.वाघाटे यांना कुठे भेटायच असे विचारले असता, त्यांनी "विसावा विसावा विसाव्याला जावू चला" असे म्हणाले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर सदर संभाषणावरून मला लोकसेवक श्री.वाघाटे यांनी हॉटेल विसावा येथे भेटण्यास बोलाविले असल्याने तेथे पडताळणी करण्याचे ठरवुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी मला तसेच पंचाना सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सुचनेनुसार 18-07 वाजताचे सुमारास व्हॉईस रेकॉर्डर चालु करून होल्डवर ठेवून माझे शर्टच्या समोरील डावे खिशात ठेवला. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सूचनेवरून मी व पंच नं.1 श्री.शुभम शिंदे असे माझे कारने लोकसेवक श्री.वाघाटे यांना भेटण्यासाठी विसावा हॉटेल महाड येथे रवाना झालो.

मी व पंच श्री.शुभम शिंदे असे माझे कारने वहुर येथून निघून विसावा हॉटेल, महाड येथे गेलो. विसावा हॉटेल येथील पार्किंग मध्ये मी माझी कार थांबविली. त्यानंतर मी व पंच श्री.शिंदे असे कारमधून उतरून मी पुढे व माझे पाठोपाठ पंच असे आम्ही विसावा हॉटेल मध्ये गेलो. तेथे एका टेबलवर मी बसलो व माझे बाजुचे टेबलवर पंच .श्री. शिंदे बसले थोडया वेळाने लोकसेवक श्री.वाघाटे हे हॉटेलमध्ये आले व मी बसलेल्या टेबलवर माझे समोर बसले. माझे समोर बसलेले इसम हे लोकसेवक श्री.वाघाटे असल्याचे मी पंच श्री.शिंदे यांना खुणेने सांगितले. तेव्हा मी लोकसेवक वाघाटे यांना माझे गुन्हयाचे प्रकरणा संदर्भात चर्चा करून "पाचची व्यवस्था.... तुम्हाला आता मी तीन देतो. प्लीज मी पाया पडतो" असे बोलणे केले. व त्यानंतर मी व पंच शिंदे असे माझे कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. माझी तसेच लोकसेवक विशाल वाघाटे यांचेमध्ये झालेले संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर लोकसेवक श्री.वाघाटे यांचा माझे मोबाईल वर 19.54 वाजता कॉल आला परंतू सदरचे कॉलवर आमचे संभाषण झाले नाही. थोड्यावेळाने 19.57 वाजता लोकसेवक श्री.वाघाटे यांचा माझे मोबाईलवर कॉल आला असता मी सदरचा माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करून कॉल रिसीव्ह केला. त्यावेळी लोकसेवक वाघाटे हे मला "आं मी आता निघलो.... कोणच ना... मी कंटाळलोय.." असे म्हणाले असता मी काय झालं ते.. पेमेंट होतंय... मी तुम्हाला बोललो ना... शब्द हाय माझा...असे म्हणालो. त्यावर लोकसेवक वाघाटे हे मला "तुमचं होऊ दे कधीही... मी आता माझं मी कंटाळलोय इथं.... मी आता निघतो म्हटलं..." असे म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवक वाघाटे यांना कुठे भेटायच असे विचारले असता "मग याना बिल्डींगच्या इथं या मी आहे." असे मला म्हणाले. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर 20.59 वा.चे दरम्यान लोकसेवक विषाल वाघाटे यांनी फोनद्वारे मला संपर्क साधला असता, मी "पाच लाखापैकी तीन लाख कसेबसे झालेले आहेत साहेब....फक्त थोडा वेळ दया ऐका ना" असे बोललो असता लोकसेवक वाघाटे यांनी "ते मरो तुमचं... तुम्ही या आधी या... राहु दे मला जेवण जायचंय.. मला भुक लागलेय" असे सांगितले. त्यामुळे पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी मला पुन्हा लोकसेवक वाघाटे यांनी बोलाविलेल्या ठिकाणी जाणेबाबत सुचना दिल्या. त्यावेळी मी भोसले मॅडम यांना मागचे वेळी पंच श्री.शिंदे यांचा लोकसेवक श्री. वाघाटे यांना संषय आला असल्याने त्यांचे ऐवजी पंच श्री.वर्तक यांना पाठविणेची विनंती केली.

त्यानंतर मी माझे कारने पंच श्री.वर्तक यांचेसह हॉटेल विसावा रिव्हरसाईड येथे जावून लोकसेवक विषाल वाघाटे यांची भेट घेतली व लाचेच्या रक्कमेबाबत पुन्हा बोलणी केली त्यावेळी मी त्यांना "गुन्हा दाखल झाला नाही पाहिजे" असे बोलला असता लोकसेवक विशाल वाघाटे यांनी "पाच" असे बोलुन लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना " पाचच्या वर एक रूपया देणार नाही", "तुम्हाला एका तासात देतो" असे बोलला असता, लोकसेवक वाघाटे यांनी शंभर टक्के असे बोलुन लाच स्विकारण्याचे मान्य करून "कुठ म्हणाल तिथं येतो मी" असे सांगितले. त्यानंतर मी पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी निघुन आलो.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी मला तसेच पंचाना सांगितले की, दिनांक 09/10/2025 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान संभाषणावरून माझेवर पॉक्सो कायद्या अंतर्गत कारवाई न करण्याकरीता लोकसेवक श्री.वाघाटे यांनी माझेकडे 5,00,000/- रूपये लाचेची मागणी करून 3,00,000/- रूपये लाचेचा पहिला हप्ता स्विकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी लोकसेवक श्री. विशाल वाघाटे यांचेविरूध्द सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरवून मला सदर सापळयाचे कामी लाचेची रक्कम म्हणून वापरण्यासाठी रक्कम 3,00,000/-रूपये आणलेत का? असे विचारले असता मी माझेकडे लाचेची पुर्ण 3,00,000/- रूपये लाचेची रक्कम नसल्याचे सांगून त्यांचेकडे 2,00,000/-रूपये असल्याचे सांगितले. तसेच नियोजित सापळा केसमध्ये वापरावयाची लाचेची रक्कम 2,00,000/- रूपये हजर केले व तेवढीच रक्कम उपलब्ध झाल्याचे सांगितले. सदरची रक्कम पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी ताब्यात घेऊन ठेवली.
त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले यांनी मला तसेच पंचांना सांगितले की, तक्रारदार यांना तीन लाख रूपये रक्कम उभी करणे शक्य झाले नसल्याने त्यांनी दोन लाख रूपये (500 रू. दराच्या 400 नोटा) हजर केल्या आहेत. परंतू लोकसेवक श्री.वाघाटे यांनी मागणी केल्यानुसार त्यांना तीन लाख रूपये रक्कम द्यावयाची असल्याने 500/- रूपये दराच्या चलनी 100 नोटांचे चार बंडल व 100 भारतीय बच्चो का बैंक पांच सौ नंबर च्या 100 नोटा ठेवून त्याला रबर लावण्यात येतील व ते बंडल 500 रू.दराच्या 100 नोटांचे आहे असे भासवून अशी 2 बंडल तयार करून भारतीय बच्चो का बैंक पाच सौ नंबरची 2 बंडले व एक ख-या नोटांचे 4 बंडल असून एकूण 6 बंडले कापडी पिशवीत भरून लोकसेवकांस तीन लाख रूपये लाचेची रक्कम म्हणून दिली जाईल. सदर लाचेची रक्कम तीन लाख रूपये असल्याचे भासविण्यात आले असले तरी त्यामध्ये ख-या नोटा फक्त 2,00,000/- रू.च्या आहेत.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्रीमती भोसले यांनी वरील बंडल सापळा पथकामधील सफौ.विनोद जाधव यांच्याकडे देऊन बंडलमधील सर्व नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावून त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हायलेट बॅटरीचे प्रकाशात मला व दोन्ही पंचाना करून दाखविले.
त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 3,00,000/- रूपये नोटांचे बंडळ एका भगव्या रंगाच्या कापडी पिषवीत ठेवुन सदर पिषविला आतून बाहेरून अँन्थासिन पावडर लावण्यात आलेली असून सदरची पिशवी माझेकडे देण्यात आली. त्यानंतर दिनांक 10/10/20225 रोजी 00.03 वाजता माझी व पंचाची वक्तव्य घेण्यात आलेली असून पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी मला तसेच पंचाना सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांनी सांगितले की, सापळ्याचे ठिकाणी जाणेकरीता माझे कारचा, शासकिय बोलेरो जिप व खाजगी एर्टीगा व डस्टर कारचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सुचनेवरून पोह/महेष पाटील यांनी त्यांच्याकडील डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो होल्डवर ठेवून माझे षर्टच्या समोरील डावे खिशात ठेवून दिला ती वेळ 00.28 वा. ची होती. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सुचनेवरून मी व पंच नं.1 श्री.वर्तक असे माझे कारमध्ये, एर्टीगा मध्ये पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले, सहा.फौ.करकरे, पोह/महेश पाटील, पंच नं.2 श्री.शिंदे असे डस्टर कारमध्ये पोलीस निरीक्षक श्री.सरोदे, पोह/सचिन आटपाडकर, शासकिय बोलेरो जिप मध्ये पोह/परम पाटील, मपोह/राऊळ, चालक पोह/सागर पाटील असे बसून वहुर येथून रवाना झालो. त्यावेळी सफौ.विनोद जाधव हे तेथेच थांबून राहीले. माझे कारचे मागोमाग तीन्ही वाहने नातेखिंड, दस्तुरी फाटा येथे सुभाष आर्केड अपार्टमेंट येथे आल्यानंतर अ‍े विंग समोर पार्किंगमध्ये तक्रारदार यांनी त्यांची कार थांबविली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले यांचे सुचनेवरून तीन्ही वाहने माझे कारपासुन थोडया अंतरावर थांबविली. त्यानंतर मी व पंच श्री. वर्तक असे उतरून बिल्डींगचे समोर थांबून राहिलो. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले, पोलीस निरीक्षक श्री.सरोदे, पंच नं.2 श्री.शिंदे व सापळा पथकातील अंमलदार हे वाहनातुन उतरून कार्यालयाचे आवारात कोणास संशय येणार नाही अशा रीतीने थांबून राहीले. त्यानंतर लोकसेवक विषाल वाघाटे हा आला नसल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार लोकसेवक विषाल वाघाटे यास त्याचे मोबाईलवर कॉल करून येताय ना असे विचारले असता तो म्हामूणकर हॉस्पीटल जवळ आला असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक विषाल वाघाटे हो त्याचे कारने आमच्या बिल्डींगच्या खाली आला. त्याचे गाडीमधून उतरून तो माझेजवळ आला व हाताचे इषा-याने पैषाबाबत विचारणा केली असता मी माझेकडील लाचेची रक्कम असलेली पिशवी त्यास दिली. व माझे पॅंटचे डावे खिशामधील रूमाल काढून त्याने माझा चेहरा पुसून सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम व त्यांचे सापळा पथकाने लोकसेवक विशाल वाघाटे यास रंगेहात पकडून त्याचेकडून सापळा रक्कम जप्त केली आहे.

अषा रितीने तक्रारदार यांचेविरूध्द जुन्या पुर्वीच्या प्रकरणामध्ये पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करणेसाठी व मदत करण्यासाठी लोकसेवक पोह/961 विशाल विलास वाघाटे यांनी स्वतासाठी दिनांक 09/10/2025 रोजी पंचासमक्ष 5,00,000/- रू. लाचेची मागणी करून पहिला हप्ता 3,00,000/- रू.लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे सापळा आजमाविला असता दिनांक 10/10/2025 रोजी 00.50 वाजता 3,00,000/- रूपये लाचेची रक्कम स्विकारताना लोकसेवक विषाल वाघाटे यांना रंगेहाथ पकडून त्यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.

म्हणुन माझी पोह/961, विशाल विलास वाघाटे, नेम.पोलीस मुख्यालय, रायगड-अलिबाग यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारित 2018) चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAMESH BAMANYA TADAVI(I (Inspector)) / POBN85251 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAMESH BAMANYA -
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN85251

पोलीस ठाणे अंमलदार
महाड शहर पोलीस ठाणे